**<u>विशेष दिवाणी दावा क्र. ४५१/२०१८ मधील निशाणी क्र. ३४ कडील अर्जावर आदेश.</u>**

१) प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. १ तर्फे त्यांच्या विरुध्द निशाणी क्र.१ वर दिनांक १७/०७/२०१९ रोजी पारीत झालेला विना कैफियत प्रकरण चालविण्याबाबतचा आदेश रद्द करुन कैफियत दाखल करण्यास परवानगी मिळण्याकरीता दाखल केला आहे.

२) वादीतर्फे प्रस्तुत अर्जास दिलेल्या म्हणण्यामध्ये असे कथन केले आहे की, प्रतिवादीचा अर्ज खोटा व लबाडीचा असून तो वादीस मान्य व कबूल नाही. सदर प्रतिवादीस दाव्याच्या समन्सची बजावणी होऊन देखील त्यांनी जाणून बुजून दाव्यात हजर राहणेस टाळाटाळ केलेली आहे व त्यामुळे अर्ज नामंजुर करावा व अर्ज मंजुर झाल्यास जास्तीत जास्त कॉस्ट करावी.

३) प्रस्तुत अर्जाच्या युक्तीवादाकामी प्रतिवादी क्र. १ च्या विद्वान वकीलांना पुकारले असता गैरहजर आहेत. वादीच्या विद्वान वकीलांना ऐकले. रोजनाम्याचे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले.

४) अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन करता असे दिसुन येते की, प्रतिवादी क्र. १ यांनी या कामी त्यांची लेखी कैफियत दाखल न केल्याने प्रस्तुतचा दावा प्रतिवादी क्र. १ यांच्याविरुध्द विना कैफियत चालविण्याबाबतचा आदेश निशाणी क्र. १ वर दिनांक १७/०७/२०१९ रोजी पारीत केला आहे. त्यानंतर प्रतिवादी क्र. १ तर्फे प्रस्तुतचा अर्ज आज रोजी दिनांक २४/०९/२०२४ रोजी दाखल केला आहे. प्रकरणाचे स्वरुप आणि अर्जातील नमुद कारण विचारात घेता माझ्या मते प्रतिवादी क्र. १ यांना या कामी त्यांची लेखी कैफियत दाखल करण्याची संधी देवुन प्रस्तुतचे प्रकरण गुणवत्तेच्या आधारे निकाली काढणे न्यायाचे व उचित ठरेल. त्यामुळे वरील नमूद कारणांचा विचार करता माझ्या मते प्रतिवादी क्र. १ ने वादीला खर्चाची रक्कम देण्याच्या अटीवर प्रस्तुतचा अर्ज मंजुर करणे न्यायाचे व उचित ठरेल. सबब हे न्यायालय न्यायाच्या दृष्टीने खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

**<u>आ दे श</u>**

१) प्रतिवादी क्र. १ ने वादीला रक्कम रुपये ५००/– इतकी खर्चाची रक्कम देण्याच्या अटीवर प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यात येतो व त्यानुसार निशाणी क्र. १ वर दिनांक १७/०७/२०१९ रोजी प्रतिवादी क्र. १ यांच्याविरुध्द पारीत केलेला प्रस्तुत दावा विना कैफियत/विना जबाब चालविण्याबाबतचा आदेश रद्द करुन प्रतिवादी क्र. १ यांना लेखी कैफियत दाखल करण्यास परवानगी देण्यात येते.

२) वरीलप्रमाणे न्यायालयात आदेशाचे कथन करुन घोषीत करण्यात आला.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by PANDURANG LIMBAJI GHULE
Date: 2024.09.24 17:14:31 +0530

(पां. लिं. घुले)

दिनांक– २४/०९/२०२४

२रे सह दि. न्या. व. स्तर, कराड.